| | **कौ.हि.म.सं.अर्ज क्र.६/२०१७ मधील नि.क्र.४२ वरील आदेश**<br>सौ. रेणुका अजित पाटील<br>वि.<br>श्री. अजित रुक्माण्णा पाटील, वगैरे. |
|---|---|

प्रस्तुत मुळ अर्ज हा अर्जदार यांनी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम १२ अन्वये विविध अनुतोष मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वि.प हे त्यांच्याविरुध्द दि.११/०१/२०२४ रोजी नि.क्र.१ वर त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.३६ पुराव्यातुन वगळण्याचा झालेला आदेश रद्द करुन मागितला आहे. अर्जात वि.प. कथन करतात की, पुराव्याचे शपथपत्र दाखल केल्यावर दरम्यानचे काळात त्यांचा अपघात झाल्यामुळे त्यांना न्यायालयामध्ये हजर राहता आले नाही. वि.प. तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, अर्ज नामंजुर झाल्यास त्यांना न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे. प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयीत होण्याकामी त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. अर्जास वि.प. यांची शपथपत्रावर पुष्टी आहे.

२. अर्जाच्या मलपृष्ठावर अर्जदार यांनी आपला खुलासा सादर करून प्रखर विरोध केला आहे. अर्जदार यांच्या कथनानुसार वि.प. यांनी चुकीचा व बेकायदेशीर अर्ज दाखल केला आहे. सदर मुळ अर्ज हा बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहे. अर्जातील अपघाताच्या कारणास समर्थनीय पुरावा वि.प. यांनी दिलेला नाही. वि.प. यांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारे पोटगी दिलेली नाही. अर्जामध्ये कोणतेही तथ्य नसल्याने त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती करून अर्ज मंजुर झाल्यास पर्यायी जास्तीत जास्त कॉस्टची मागणी केलेली आहे.

३. दोन्ही बाजुकडील विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. अर्ज व त्यावरील खुलाश्याचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, प्रस्तुत मुळ अर्ज हा अर्जदार यांनी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम

कलम १२ अन्वये विविध अनुतोष मिळण्यासाठी दि.०३/०३/२०१७ रोजी दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदार यांचा पुरावा बंद झाल्यावर वि.प. यांनी दि.०२/०९/२०२२ रोजी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.३६ वर दाखल केले आहे. तद्नंतर, प्रकरणाचा रोजनामा पाहिला असता वि.प. हे सतत गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. वि.प. यांच्या कथनानुसार दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांचा अपघात झाल्याने त्यांना हजर राहता आले नाही. परंतु, वि.प. यांचा अपघात झाला होता हे दर्शविण्यासाठी त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे, अर्जातील कथन हे संयुक्तिक वाटत नाही. परंतु, नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने उभयपक्षकारांना आपापली केस शाबित करण्याची संपुर्ण संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे, प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयीत होण्यास देखील मदत होणार आहे. वि.प. यांना त्यांनी केलेल्या विलंबासाठी खर्चाची रक्कम आकारुन त्यांचा नि.क्र.३६ वरील पुरावा पुनुरुज्जिवीत केल्यास त्यायोगे अर्जदार यांची कोणतीही हानी संभवत नाही. उलटपक्षी वि.प. यांना अशी संधी न दिल्यास त्यांची हानी होणार आहे. त्यामुळे, वि.प. यांचा अर्ज मान्य होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

वि.प. यांनी रक्कम रु.१,०००/– खर्चापोटी अर्जदार यांना अदा करण्याच्या पूर्वअटीवर नि.क्र.४२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

वि.प. यांनी सदर रक्कम न्यायालयात भरल्यानंतर अथवा अर्जदार यांना समक्ष दिल्यावर त्यांच्याविरुध्द पारीत झालेला नि.क्र.१ वरील दि.११/०१/२०२४ रोजीचा पुरावा वगळण्याचा आदेश रद्द ठरेल.

वि.प. यांनी या आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत बिनचुक करावयाची आहे.

उभयपक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/–

**दि.२२/०२/२०२४.** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**चंदगड** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चंदगड.**